
# प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वार्षिक निधीचे अंदाजपत्रक समजून घेण्यासाठी अभ्यास...




## अभ्यासाचे निष्कर्ष -

- दुर्गम डोंगराळ भागातील प्रा.आ.कें.च्या अभ्यासानुसार प्रा.आ.कें.ला रु.२,३७,११,१४७/- इतका निधी मिळाला, ह्या निधीनुसार प्रा.आ.कें..च्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिव्यक्ती वर्षभरासाठी उपलब्ध निधी फक्त रु.५१/- आहे.

- वर उपलब्ध निधी पैकी प्रा.आ.कें.ने रु.२,१६,००,६८४/- इतकी रक्कम खर्च केली. म्हणजे उपलब्ध निधीच्या ९१% रक्कम खर्च करण्यात आली.

- महाराष्ट्र शासनाच्या २०१८-१९ च्या आर्थिक तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन प्रति व्यक्ती रु.८३/- खर्च करत आहे, पण प्रत्यक्षात प्राथमिक सेवेसाठी रु.४७/- इतकाच निधी खर्च करण्यात येत आहे असे दिसून येते. खरतरं प्राथमिक सेवेचा खर्च दुप्पट केला पाहिजे, कारण राष्ट्रीय पातळीवर सरकार प्रतिव्यक्ती रु.१२५/- इतका निधी खर्च करत आहे. महाराष्ट्र सरकारचा आरोग्यावरील खर्च हा राष्ट्रीय आरोग्याच्या खर्चाइतका होईल यासाठी तातडीने प्रयत्न करायला हवेत.

- या अभ्यासा दरम्यान औषधांच्या किंमती ठरवण्यात आणि त्याचा खर्च काढण्यामध्ये आम्हाला मर्यादा आल्या. सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या घाऊक किंमतीच्या आधारे प्रा.आ.कें.तील लागलेल्या औषधांच्या किंमती काढल्या आहेत, पण सरकार जेव्हा अतिजास्त प्रमाणात औषधे खरेदी करते तेव्हा त्याची किंमतही घाऊक बाजारातील किंमतीपेक्षा अधिक कमी असते. पण त्याबाबतची माहिती मिळणे कठीण गेले.

## प्रस्तावना -

महाराष्ट्र शासनाचे आरोग्य विभागाचे बजेट पाहिले तर लक्षात येते की महाराष्ट्र शासन गेल्या वर्षीच्या तुलनेत आरोग्य सेवावरील खर्च कमी करत चालले आहे. उदा. राज्य सकल उत्पन्नाच्या प्रमाणात सन २०१७-१८ मधील राज्याचा आरोग्यावरील खर्च ०.४८% इतका आहे. आरोग्य विभागाचे २०१७-१८ चे सुधारित अंदाज पत्रकानुसार असलेले एकूण बजेट रु. १४,४८८/- कोटी इतके होते त्या प्रमाणात २०१८-१९ चे अंदाज पत्रकात वाढ होणे अपेक्षित आहे. पण प्रत्यक्षात २०१८-१९ चे बजेट रु. १३,४५०/- कोटी इतके आहे. एखाद्या आरोग्य केंद्राला चालवण्यासाठी वर्षाला किती निधी आवश्यक आहे याचा अभ्यास केल्यास राज्याच्या आरोग्य आर्थिक नियोजनात त्याचा वापर करता येऊ शकतो. त्याप्रमाणात बजेटची मांडणी आणि मागणी करता येऊ शकते. सर्वसामान्य जनतेला चांगल्या दर्जाच्या आरोग्य सेवा पुरवण्यासाठी आरोग्य सेवांचे आर्थिक नियोजन करणे आवश्यक आहे. हा उद्देश लक्षात घेऊन 'साथी संस्थे'ने प्रा.आ.केंद्र करंजावणे ता. वेल्हा, जिल्हा पुणे येथे हा अभ्यास केला.

## अभ्यासाचा हेतू -

जिल्ह्यातील गुणवत्तापूर्वक आरोग्य सेवा देणाऱ्या एका प्रा.आ.केंद्राला एका वर्षासाठी येणारा एकूण खर्च काढणे व त्या अभ्यासाचा उपयोग राज्याच्या आरोग्य बजेट नियोजनासाठी करणे, या उद्देशाने हा अभ्यास करण्यात आला.

## अभ्यासाचे निकष -

- करंजावणे प्रा.आ. केंद्र हे वेल्हे तालुक्यातील एक उत्तम सेवा देणारे व सरकारच्या सेवेनुसार 'अ' निकषात बसणारे प्रा.आ.केंद्र आहे.
- सरकारच्या प्रा.आ.केंद्रासाठी लोकसंख्येच्या असलेल्या निकषांमध्ये हे प्रा.आ. केंद्र बसते.
- वेल्हे हा डोंगराळ आणि दुर्गम तालुका असून तालुक्यात एकूण तीन प्रा.आ.केंद्र आहेत, त्यातील करंजावणे प्रा.आ. केंद्र हे रस्त्यावर असल्यामुळे तालुक्यातील रुग्ण सेवा घेण्यासाठी इथे येतात असा अनुभव आहे. प्रा.आ.केंद्राच्या बाह्यरुग्ण विभाग आणि आंतररुग्ण विभागातून सेवा घेणाऱ्या रुग्णांची संख्या जास्त आहे.
- कायाकल्प आणि नॅशनल अक्रीडेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल अॅण्ड हेल्थकेअर प्रोव्हायडर या निकषांमध्ये हे प्रा.आ. केंद्र बसत असल्याने हे प्रा.आ. केंद्र अभ्यासासाठी निवडण्याचे ठरवले.
- प्रा.आ. केंद्राच्या वार्षिक खर्चाचा अभ्यास करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती देण्याचे प्रा.आ. केंद्र वैद्यकीय अधिकारी आणि तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी मान्य केले. त्यामुळे हे प्रा.आ. केंद्र या अभ्यासासाठी निवडण्यात आले.

## प्रा.आ. केंद्राच्या स्थापनेबाबतचे निकष -

एखाद्या गावात प्रा.आ. केंद्र स्थापन करत असताना किमान काही बाबी निकष म्हणून पाळल्या जातात. गावाची निवड पुढील मुद्द्यांच्या आधारे होते-

- गावात किमान चौथीपर्यंत शाळा असली पाहिजे, गावात राज्य परिवहन महामंडळाची बस सेवा उपलब्ध असली पाहिजे, गावात पाणी व विजेची सोय असली पाहिजे.
- गावाने प्रा.आ. केंद्र बांधण्यासाठी सरकारच्या नावे जागा भेट दिली पाहिजे कारण सरकार जागा विकत घेण्याचा खर्च करत नाही. प्रा.आ. केंद्र बांधण्यासाठी किमान दोन एकर जागा आवश्यक आहे. यातील एक एकर जागेमध्ये प्रा.आ. केंद्राची इमारत आणि उर्वरित एक एकर जागेमध्ये कर्मचाऱ्यांच्या राहण्याच्या क्वार्टर आणि पोस्टमॉर्टम रूमची व्यवस्था करावी लागते.
- गावाने प्रा.आ. केंद्रासाठी जागा सरकारच्या नावावर केल्यानंतर सरकारकडून प्रा.आ. केंद्र बांधण्यासाठी प्रस्ताव तयार करून राज्य सरकारकडे पाठवण्यात येतो, राज्य सरकारची मान्यता मिळाल्यानंतर प्रा.आ. केंद्र बांधण्यासाठी निधी देण्यात येतो. हा निधी पाच कोटी असतो.
- या निधीमध्ये प्रा.आ. केंद्राची इमारत, चार अधिकारी व कर्मचाऱ्यांचे क्वार्टर (चार खोल्या असलेले दोन क्वार्टर आणि तीन खोल्या असलेले दोन क्वार्टर), एक पोस्टमॉर्टम रूम आणि गाडीसाठी पार्किंग अशी व्यवस्था असते.

या निकषांच्या आधारे करंजावणे प्रा.आ. केंद्र बांधले गेले आहे.

## या अभ्यासासाठी लागणारी आवश्यक माहिती

- या अभ्यासामध्ये प्रा.आ. केंद्राकडून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील सर्व माहिती घेण्यात आली. या अभ्यासादरम्यान दोन प्रकारची माहिती घेण्यात आली.
- पहिली म्हणजे प्रा.आ. केंद्राकडून दिलेल्या सेवासंबंधींची आकडेवारी घेण्यात आली. या माहितीमध्ये प्रा.आ. केंद्रामार्फत देण्यात येणारी सेवा उदा. सेवा देत असलेली लोकसंख्या, या आर्थिक वर्षात झालेली बाळंतपणे, बाह्यरुग्ण विभागातून सेवा दिलेल्या रुग्णांची संख्या, प्रा.आ. केंद्र अंतर्गत आंतररुग्ण संख्या, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झालेल्या स्त्री व पुरुष रुग्णांची संख्या, संदर्भ सेवेसाठी वाहनाची सेवा दिलेल्या रुग्णांची संख्या, प्रयोगशाळेतून तपासणी केलेल्या रुग्णांची संख्या तसेच राष्ट्रीय कार्यक्रमा अंतर्गत दिलेल्या सेवा तसेच पल्स पोलिओ इ. सारखे विविध कार्यक्रम याविषयी माहिती घेण्यात आली. याशिवाय प्रा.आ. केंद्राच्या देखभालीसाठी लागणारा निधी, वीज बिल इतर अनेक खर्च याबाबतही माहिती घेतली.
- दुसऱ्या प्रकारची माहिती म्हणजे २०१७-१८ या आर्थिक वर्षात प्रा.आ. केंद्राला राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या अ, ब, क घटकानुसार मिळालेला निधी, जिल्हा परिषद आणि इतर ठिकाणाहून मिळालेला निधी, प्रा.आ. केंद्राला मिळालेली औषधे आणि प्रा.आ. केंद्राच्या सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन यासाठी लागलेली रक्कम शिवाय आशा कार्यकर्त्या आणि आशा सुपरवायझर यांना मानधनासाठी दिलेली रक्कम, अशा प्रकारची सेवा देण्यासाठी खर्च होणाऱ्या निधीची माहिती घेण्यात आली.

**प्रा.आ. केंद्रामार्फत वर्षभरात देण्यात आलेल्या सेवांची आकडेवारी**

| क्र. | दिल्या जाणाऱ्या सेवा | आकडेवारी |
|---|---|---|
| १. | प्रा.आ.कें. सेवा देत असलेली एकूण लोकसंख्या | ३८००० |
| २. | वर्षभरातील आंतररुग्ण विभागात सेवा घेतलेल्यांची संख्या | १२०० |
| ३. | वर्षभरातील बाह्यरुग्ण विभागात सेवा घेतलेल्यांची संख्या | २४००० |
| ४. | वर्षभरात सर्व प्रकारच्या तपासण्या केलेल्या रुग्णांची संख्या | ६१०८ |
| ५. | वर्षभरातील एकूण बाळंतपणे | १२० |
| ६. | वर्षभरात संदर्भ सेवा दिलेल्या रुग्णांची संख्या | १५९ |

- प्रा.आ. केंद्राच्या आवक आणि जावक अशा दोन्ही प्रकारच्या माहितीच्या पलीकडे प्रा.आ. केंद्र चालवण्यासाठी लागणारे साहित्य, मशीन, इतर सुविधा, इमारत, फर्निचर, गाडी आणि आवश्यक सर्व बाबींच्या किंमती या अभ्यासात विचारात घेण्यात आल्या.

## मिळालेल्या माहितीचे विश्लेषण

### ■ आशांना देण्यात येणारा मोबदला-

सुरुवातीला आशा कार्यकर्त्यांना दिलेल्या मोबदल्याच्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. यामध्ये ३७ आशांना दिलेल्या मोबदल्यासाठी दर महिन्याला आणि वार्षिक खर्चाची रक्कम काढण्यात आली. यानुसार प्रत्येक आशाला दर महिन्याला साधारण रु. २,२३७/- याप्रमाणे एकूण रु. ८२,७८५/- एवढी रक्कम आशांना देण्यात येणाऱ्या मोबदल्यासाठी खर्च करण्यात येते. वर्षाला साधारण रु. ९,१०,६३०/- एवढी रक्कम खर्च करण्यात आली.

तसेच तीन आशा गट प्रवर्तक यांचे मानधन (५,०००*३) रु.१५,०००/- प्रती माह याप्रमाणे वर्षाचे रु. १,८०,०००/- खर्च करण्यात आले.

### ■ अधिकारी-कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च-

प्रा.आ.केंद्रात कार्यरत असलेल्या सर्व कर्मचारी आणि प्रा.आ.केंद्राच्या कार्यकक्षेत येणाऱ्या ११ उपकेंद्रातील सर्व कर्मचारी मिळून २९ नियमित आणि १० (उपकेंद्र अर्धवेळ कर्मचारी) मिळून ३९ अधिकारी-कर्मचारी प्रा.आ. केंद्र अंतर्गत काम करत आहेत. या सर्व कर्मचाऱ्यांच्या महिन्याचा वेतन खर्च रु.४,५८,९३७/- इतका असून वार्षिक खर्च रु.५५,०७,२४३/- इतका असल्याचे दिसून आले.

### ■ राष्ट्रीय आरोग्य अभियान व जिल्हा परिषदेकडून मिळालेला निधी-

प्रा.आ.केंद्राला राष्ट्रीय आरोग्य अभियान आणि जिल्हा परिषद अंतर्गत एकूण रु.१९,६८,२७०/- इतका निधी प्राप्त झाला. यामध्ये जिल्हा परिषदेच्या शारदा ग्राम संजीवनी योजनेमार्फत रु.१,९९,५००/- इतका निधी प्रा.आ.केंद्राला मिळाला. प्रा.आ.केंद्राकडून राबवण्यात येणाऱ्या विविध शिबिरांसाठी रु.१,६७,५००/- इतका निधी मिळाला. राष्ट्रीय कार्यक्रम आणि वैभव लक्ष्मी योजनेसारख्या योजना राबवण्यासाठी काही निधी मिळाला, शिवाय प्रा.आ.केंद्रामार्फत गट विकास अधिकारी यांच्याकडे देण्यात आलेल्या बिलांपैकी काही निधी प्रा.आ.केंद्राला परत मिळाला, रुग्ण कल्याण समितीला आलेला निधी असा २०१७-१८ या आर्थिक वर्षात आलेला सर्व निधी एकत्र करण्यात आला आहे.

याशिवाय कायाकल्प कार्यक्रमाअंतर्गत प्रा.आ.केंद्राला रु.२,००,०००/- ही रक्कम उपलब्ध झाली आहे, तसेच नॅशनल अक्रीडेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल ॲण्ड हेल्थकेअर प्रोव्हायडर या कार्यक्रमा अंतर्गत प्रा.आ.केंद्राला रु.५२,०००/- मिळाले.

प्रा.आ.केंद्राला वरील सर्व खर्च, औषधे आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनाची रक्कम मिळून एकूण रु. २,३७,११,१४७/- इतका निधी मिळाला, त्यातील रु. २,१६,००,६८४/- एवढी रक्कम खर्च करण्यात आली, ही रक्कम प्रा.आ.केंद्राच्या नियमित खर्च, कर्मचाऱ्यांचे वेतन, विविध कार्यक्रमांची शिबिरे, लोकांना देण्यात आलेल्या संदर्भसेवा, आशांचा मोबदला, गट प्रवर्तक यांचे मानधन, गाडीच्या डिझेलचा खर्च, राष्ट्रीय कार्यक्रमांची अंमलबजावणी, कमी पडलेल्या औषधांची खरेदी, स्वच्छता, वीज बिल, इंटरनेट बिल यासारख्या बाबींवर खर्च झाले आहेत.

### ■ प्रा.आ.केंद्राला उपलब्ध झालेली औषधे-

प्रा.आ.केंद्राला जिल्हा स्तरावरून आणि विविध स्तरावरून उपलब्ध झालेल्या औषधांची माहिती घेण्यात आली. यामध्ये औषध वितरकांनी दर महिन्याला प्रा.आ.केंद्रासाठी मागवलेली औषधे आणि त्या मागणीच्या प्रमाणात त्यांना उपलब्ध झालेली औषधे याची माहिती घेण्यात आली होती. यावरून साधारण किती औषधे वर्षभरात वापरली गेली याची माहिती घेण्यात आली. या वापरल्या गेलेल्या औषधांच्या होलसेल बाजारातील किंमती काढून त्यानुसार औषधांचा खर्च काढण्यात आला. त्यानुसार या वर्षात रु.८५,०८,१२५/- एवढ्या किंमतीची औषधे २०१७-१८ या आर्थिक वर्षात वापरण्यात आली.

### ■ प्रा.आ.केंद्रासाठी लागणारे सर्व साहित्य-

बाळंतपणाची खोली, शस्त्रक्रिया खोली यात लागणारे सर्व साहित्य व हत्यारे, प्रा.आ.केंद्रासाठी लागणारे फर्निचर, खुर्च्या टेबल, कपाटे इतर सुविधेच्या वस्तू यांची प्रत्येक खोलीनिहाय यादी करण्यात आली, त्यावरून प्रत्येक खोलीतील लागलेल्या साहित्याची होलसेल किंमत काढण्यात आली. त्यावरून सर्व साहित्याची एकूण किंमत रु.२५,९५,९१०/- इतकी आहे असे आढळले.

**प्रा.आ. केंद्रामार्फत वर्षभरात देण्यात आलेल्या सेवांची आकडेवारी**

| क्र. | हेड | वार्षिक खर्च |
|---|---|---|
| १. | आशांचा मोबदला | रु. ९,१०,६३०/- |
| २. | आशा गटप्रवर्तक | रु. १,८०,०००/ |
| ३. | अधिकारी-कर्मचारी वेतन | रु. ५५,०७,२४३/- |
| ४. | प्रा.आ.कें.कडे आलेला राष्ट्रीय आरोग्य अभियान व जिल्हा व जिल्हा परिषद यांच्याकडील निधी तसेच कायाकल्प बक्षीस निधी आणि NABH अंतर्गत मिळालेला निधीतून एकूण खर्च झालेली रक्कम | रु. १८,७८,०७७/- |
| ५. | प्रा.आ.कें.मार्फत सेवा देण्यासाठी लागलेली औषधांची किंमत | रु. ८५,०८,१२५/- |
| | **प्रा.आ.कें.साठी खर्च झालेली वार्षिक रक्कम** | **रु.१,६९,८४,०७५/-** |
| ६. | प्रा.आ.कें.चे सर्व साहित्य व फर्निचरसाठी लागलेली किंमत | रु. २६,५३,५६३/- |
| | **प्रा.आ.कें.चा एकूण सेवा देण्यासाठी झालेला खर्च आणि फर्निचरची रक्कम मिळून होणारी रक्कम** | **रु.१,९६,३७,६३८/-** |

केसपेपरची रक्कम, एन.ए.बी.एच व एन.क्यू.बी.एच. प्रयोगशाळा साहित्याची रक्कम. रुग्ण कल्याण समितीच्या निधीची उर्वरित रक्कम हे सर्व आकडे वरील टेबलमध्ये वगळण्यात आले आहेत. सर्व खर्च एकत्रित केल्यास रु.२,१६,००,६८४/- एवढी रक्कम खर्च वर्षभरात खर्च झाली आहे.

## सारांश


डोंगराळ आणि दुर्गम भागातील प्रा.आ.केंद्रामध्ये चांगल्या दर्जाची सेवा द्यायची असेल तर प्रा.आ. केंद्रातील सर्व अधिकारी-कर्मचारी यांचे वेतन, औषधे, प्रयोगशाळेतील सर्व आवश्यक तपासण्या, आशा कार्यक्रम, प्रा.आ. केंद्राचे सर्व राष्ट्रीय आणि इतर सर्व कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी रु. २,१६,००,६८४/- इतका निधी खर्च झाला आहे. पण औषधांची वर्षभरातील स्थिती पाहिली असता हा खर्च आणखी असू शकतो. हा खर्च सध्याच्या उपलब्ध असलेल्या अधिकारी-कर्मचारी यांच्यासह फक्त सर्व प्रकारचे कार्यक्रम राबवण्यासाठी आलेला खर्च आहे. ह्या खर्चाच्या आधारे १००० लोकसंख्येसाठी रु.५,६८,४३९/- एवढा वार्षिक आणि रु.४७,३६९/- प्रती महिना खर्च करण्यात येतो. प्रतिव्यक्ती दर महिन्याला रु.४७/- प्रा.आ. केंद्र खर्च करत आहे हे दिसून येते. राष्ट्रीय पातळीवरील खर्चाची रक्कम पहिली तर प्रतिव्यक्ती दर महिन्याला रु.१२५/- खर्च करण्यात येत आहे, त्यामुळे महाराष्ट्रात आणि पुणे जिल्ह्यात हा खर्च किमान वाढून रु.१००/- पर्यंत केला पाहिजे. तर आपण देशातील दरडोई आरोग्य खर्चाच्या किमान जवळपास पोचू शकतो.


## या अभ्यासाची मर्यादा

१. प्रा.आ. केंद्राकडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करत असताना प्रा.आ. केंद्रामध्ये आलेल्या रुग्णांना सेवा देण्यासाठी करण्यात आलेला खर्च आणि प्रा.आ. केंद्राच्या अंतर्गत गावांमधील लोकांच्या आरोग्य सेवांसाठी झालेला खर्च वेगळा करता आला नाही.

२. या आर्थिक वर्षात खर्च झालेल्या रकमेच्या आधारावरच प्रा.आ. केंद्राचा खर्च काढण्यात आला आहे.

३. प्रा.आ. केंद्राच्या रिक्त पदांची आणि त्यानुसार त्यांच्या वेतनाची माहिती या खर्चामध्ये घेता आली नाही, कारण व्यक्तीच्या कामाच्या वर्षांचा अनुभव आणि त्यानुसार ठरणारी वेतनाची रक्कम या खर्चामध्ये घेणे शक्य नसल्याने तो खर्च यात घेतला नाही.

४. त्याचप्रमाणे औषधांची किंमत काढताना प्रत्यक्ष लागलेल्या औषधांचा खर्च या अभ्यासात घेतला आहे. पण या आर्थिक वर्षात औषधे कमी असल्याने बरेचदा रुग्णांना पुरवून औषधे द्यावी लागली आहेत. त्यामुळे रुग्णांच्या मागणीनुसार औषधे देता आलेली नसल्याने औषधांची आलेली किंमत अतिशय कमी आहे. प्रत्यक्षात ती किती असू शकेल हे सांगता येत नाही.

५. इमारत आणि इतर फर्निचर यावरील घसारा किंमत ह्या सर्व मांडणीमध्ये गृहीत धरलेली नाही. कोणत्याही इमारतीची किंवा वस्तूची खरेदी झाल्यानंतर १०% दराने दरवर्षी त्या वस्तूची किंमत कमी होते असा आयकर कायद्याचा नियम आहे. त्यामुळे एकूण इमारतीच्या किमतीच्या आधारे दरवर्षी ही घसारा रक्कम गृहीत धरली जायला हवी, त्याप्रमाणे सर्व फर्निचर बाबतही हा नियम लागू होतो. या मुद्यावर अजून खोलात काम करणे आवश्यक आहे व ती रक्कम दरवर्षीच्या एकूण खर्चाच्या रकमेमध्ये जोडली जायला हवी.

## अभ्यासाच्या आधारे ठोस सूचना

- करंजावणे हे शासकीय निकषाच्या आधारावरील 'अ' गटात मोडणारे प्रा.आ. केंद्र आहे, या प्रा.आ. केंद्राचा प्रत्यक्ष खर्च या अभ्यासातून काढण्यात आला आहे. पण प्रा.आ. केंद्राच्या कामगिरीनुसार प्रत्यक्ष अ, ब आणि क गटातील प्रा.आ. केंद्राचा अभ्यास करून प्रत्यक्ष वार्षिक खर्च काढणे आवश्यक आहे. त्या आधारे राज्यातील सर्व प्रा.आ. केंद्राच्या खर्चाचे बजेट काढता येईल. त्या आधारानुसार प्रतिव्यक्ती राज्याने किती निधी आरोग्य विभागाला दिला पाहिजे हे मांडता येईल.
- राज्य सरकारने प्रा.आ. केंद्राचे बजेट वाढवणे अत्यावश्यक आहे त्यासाठी किमान प्रती रुग्ण रु.१००/- इतका वार्षिक खर्च प्रा.आ. केंद्राला केला पाहिजे.
- प्रा.आ. केंद्रातून दर्जेदार सेवा द्यायच्या असतील तर वर्षभरातील कामाच्या उद्दिष्टांच्या आधारे निधी देण्याचे निकष बंद केले पाहिजे. प्रा.आ. केंद्राच्या गरजेनुसार त्यांना निधी उपलब्ध केला पाहिजे.
- अभ्यासावरून असे दिसते की करंजावणे प्रा.आ. केंद्र तालुक्यातील रुग्णांना चांगली सेवा पुरवत असले तरी प्रा.आ.कें.ला उपलब्ध असणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे जर सर्व प्रा.आ.कें.च्या सेवांमध्ये दर्जेदार सुधारणा करायची असेल तर आकृतिबंध आराखड्यानुसार अधिकारी व कर्मचारी यांची पदे भरली गेली पाहिजेत.
- अभ्यासादरम्यान औषधांच्या संबंधी घेतलेल्या माहितीवरून असे दिसून आले की वर्षभरात प्रा.आ.कें.ला मिळालेल्या औषधांचा पुरवठा हा रुग्णांच्या गरजेच्या प्रमाणात सतत कमीच होता, त्यामुळे याबाबतीत राज्य सरकारने तामिळनाडू, राजस्थान, केरळ या राज्यांप्रमाणे ठोस औषध खरेदी व वितरण धोरण अवलंबिले पाहिजे. त्यामुळे कमी निधीमध्ये मुबलक औषधांचा पुरवठा सर्व आरोग्य केंद्रांना करणे सरकारला शक्य होईल.


- प्रकाशक
  **साथी** (Support for Advocacy & Training to Health Initiatives)
  **अमन-ई टेरेस, प्लॉट नं. १४०, डहाणूकर कॉलनी,**
  **कोथरूड, पुणे - ४११०३८;**
  **फोन :** ९१-२०-२५४७२३२५, २५४७३५६५
  Email : sathicehat@gmail.com
  Website: www.sathicehat.org

साथी

- आभार
  **रचना पुनर्बांधणी संस्था**
- लेखन
  **तृप्ती मालती, दिपाली यक्कुंडी. डॉ नितीन जाधव**
- कलानिर्देशन
  **शारदा महल्ले**
- मुद्रक
  **संस्कृती डिझायनर्स, पुणे**
- अर्थसाह्य
  **National Foundation of India**
- Courtesy
  **CBGA Publication- Volume 10**
- **डिसेंबर, २०१८**